# पुणे महानगरपालिका

बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर,
पुणे – ४११००५

(आपुढील पत्रव्यवहार खालील क्रमांक व दिनांक यांच्या उल्लेखासह करावा)
(कार्येक्षा या इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला (संमती नकाशासह)

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४/४५/५८/६९ यांतील आणि महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट कलम २५३ व २५४ मधील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्ताव क्रमांक | BLD/0015/14 | क्रमांक | CC/0280/16 |
| Proposal Type | Residential | दिनांक | 11/5/2016 |
| Case Type | Revised | | |
| Project Type : | Proposed Building | | |

श्री./श्रीमती M/S WHITE FEATHER LANDMARK THR' YOGESH PATE (PAH) द्वारा लु.म.श्री. ANAND S GADIYA (CA/2007/40841) यांस राहणार पुणे, पेठ B-2/310, MANMOHAN PARK, BEHIND JAIPUR GARDEN HOTEL, BIBVEWADI महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ चे कलमे ४४/४५/५८/६९ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ चे कलम २५३/२५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पेठ BALEWADI घरांक सर्व्हे नं. 83 हिस्सा नं. 2 फायनल प्लॉट क्र. प्लॉट क्र. (1) (सोसायटी) येथे विकास करण्यासाठी आपण महानगरपालिकेकडे दिनांक 25/4/2016 रोजी प्रस्ताव दाखल केला आहे.

**अटी**

१. सदरचा प्रस्तावातील दर्शविण्यात आलेली दर्शनी अंतरे/रस्ता प्रमाणरेषा पर्यंतचे क्षेत्र पुणे म.न.पा. च्या सुचनेनुसार भविष्यात सार्वजनिक रस्त्याचा भाग राहणार आहे.
२. कोणत्याही नवीन इमारतीचा अथवा वाढीव/दुरुस्त इमारतीचा कार्य अथवा वापरासाठी परवानगी वा ताबा हा कोणत्याही व्यक्तिद्वारे पुणे म.न.पा.चे भोगवटापत्र प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.
३. सदर संमतीपत्राची / विकास परवानगीची मुदत (काम सुरू झालेले नसल्यास) संमतीपत्राचे दिनांकापासून १ वर्षाची राहील. सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजण्यात यावा.
४. सदर संमतीपत्र हे मुदत संपल्यानंतर प्रत्येक वर्षी नूतनीकरण करणे आवश्यक आहे, असे नूतनीकरण सलग तीन वेळा करता येईल. तसे न झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये नवीन अर्ज करून संमती घ्यावी लागेल. एम.आर.टी.पी. कलम ४८ अन्वये संमतीपत्राची वैधता राहील.
५. सदरचे संमतीपत्र हे पुढील अटींचा भंग झाल्यास रद्द करण्यास पात्र राहील.
   (अ) जागेवरील विकसन/बांधकाम हे मान्य नकाशाप्रमाणे दर्शविलेल्या/प्रस्तुत केलेल्या वापरानुसार होत नसल्यास अथवा सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम/अनधिकृत वापर चालू असल्यास अटींचा भंग समजण्यात येईल.
   (आ) सदर बांधकाम प्रस्तावातील संदर्भातील नमूद केलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यास/झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.
   (इ) अर्जदाराने सदरची परवानगी गैरकृत्य करून पुणे म.न.पा.ची दिशाभूल करून प्राप्त केलेली आहे, असे निदर्शनास आल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल. विकास नियंत्रण नियमावली, नियम क्र. ६.१०, महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट कलम २५८ अन्वये सदरची परवानगी दिशाभूल करून घेण्यात आली असे समजण्यात येईल.
   (ई) अर्जदार आणि जो इसम हा स्वतः किंवा त्याच्याद्वारे मालकी हक्काचा दावा करून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४२ व ४५ अन्वये असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून जमीन विकसन अथवा बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरची परवानगी दिशाभूल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.
६. सदर संमतीपत्राबरील/लगत असलेल्या अटी व सूचना या केवळ अर्जदारास नव्हे तर भविष्यातील अर्जदाराचे सर्व वालीवारस, मुखत्यारधारक, व्यवस्थापक, प्रशासक, वारसदार आणि प्रत्येक इसम जो अर्जदाराच्याद्वारा मालकी हक्क सिध्द करेल त्या सर्वांस कायमस्वरूपी बंधनकारक राहील.
७. काम सुरू करण्यापूर्वी एन.ए. ऑर्डर दाखल करणे.
८. अकृषिक दाखला (एन.ए. ऑर्डर), यु.एल.सी. आदेश, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळ, औद्योगिक संचलनालय, कामगार विमा आयुक्त यांचे आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होत आहे, असे पुणे म.न.पा.चे निदर्शनास आल्यास सदरचे संमतीपत्र रद्द करण्याचा अधिकार पुणे म.न.पा.स राहील. वरील संमतीपत्राविषयी काही शंका येत असेल तर कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.



Pinya
इमारत निरीक्षक
बांधकाम विकास विभाग
पुणे म.न.पा.

TRUE COPY

Patil 1/6/2016
उप अभियंता
बांधकाम विकास विभाग
पुणे म.न.पा.

अटी पुढे चालू....

9340e 83 4C